आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र – रात्री ८.०५ वाजता

२१ सप्टेंबर २०२३ –  गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यसभेत महिला आरक्षणाबाबत चर्चा सुरू

- रेल्वे अपघातानंतर दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीत रेल्वेकडून 10 पटीने वाढ

- कॅनडामधल्या व्हिसा सेवा भारताकडून तात्पुरत्या स्थगित

**आणि**

- आशिया चषक फुटबॉल स्पर्धेत भारतीय पुरुष संघ विजयी, महिला संघाचा मात्र पराभव

<><><><><><><>

राज्यसभेत आज 'नारी शक्ती वंदन अधिनियम' या  विधेयकावर चर्चा सुरू आहे. महिलांना लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये एक तृतीयांश आरक्षण देण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे. केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी आज याबाबतचं  घटना दुरुस्ती विधेयक संसदेच्या वरिष्ठ सभागृहात मांडलं. लोकसभेत काल हे विधेयक मंजूर झालं होतं. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातल्या महिलांसाठीचं ३३ टक्के आरक्षण देखील सध्याच्या कोट्या अंतर्गत दिलं जाणार असून,  त्यासाठी जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचना आवश्यक असल्याचं मेघवाल यांनी सांगितलं.

काँग्रेसनं या विधेयकाला पाठिंबा दिला आहे मात्र विधेयक सादर करण्यात झालेल्या विलंबाबद्दल काँग्रेस खासदार रंजित रंजन यांनी नाराजी व्यक्त केली.

तृणमूल काँग्रेसच्या डोला सेन, द्रमुकच्या डॉ कनिमोळी सोमू आणि आप पक्षाचे संदीप कुमार पाठक यांनीही चर्चेत भाग घेतला.

**<><><><><><><>**

लोकसभेत आज चांद्रयान-३ चे यश आणि अवकाश तंत्रज्ञान क्षेत्रातल्या इतर यशाबद्दल चर्चा झाली. विकसित देश चंद्रापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत असताना भारतानं चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहोचण्यात यश आल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी चर्चा सुरू करताना म्हटलं. इस्रोच्या महिला शास्त्रज्ञांचंही त्यांनी अभिनंदन केलं. चंद्रावर अलगद उतरुन भारतानं नवा इतिहास रचल्याचं काँग्रेस खासदार शशी थरुर म्हणाले. त्यांनी अवकाश संशोधन क्षेत्रातल्या पंडित जवाहरलाल नेहरू, विक्रम साराभाई, सतिष धवन यांच्या योगदानाची आठवण काढली. द्रमुकचे ए राजा, तृणमृल काँग्रेसचे सौगत रॉय, राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळे, शिवसेनेचे प्रतापराव जाधव, समाजवादी पक्षाच्या डिंपल यादव यांनीही इस्रोचं कौतुक केलं.

**<><><><><><><>**

तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या गर्भवती महिलांकडे विशेष लक्ष पुरवण्याची शिफारस संसदीय समितीनं केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालाच्या अनुषंगानं ही शिफारस करण्यात आली असून, महिला कैदींची प्रसूती पूर्व आणि प्रसूती पश्चात काळजी घेण्यासाठी आणि त्यांच्या मुलांसाठी कारागृहात पुरेशा सुविधा असायला हव्यात, असं या समितीच्या अहवालात म्हटलं आहे. समितीचे अध्यक्ष ब्रिजलाल यांनी आज संसदेत याबाबतचा अहवाल सादर केला. तुरुंगात जन्माला येणाऱ्या बालकांची शारिरीक आणि मानसिक पातळीवर योग्य  काळजी

घेता यावी, यासाठी त्यांना वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत आपल्या आई बरोबर राहण्याची परवानगी द्यावी, अशी शिफारसही समितीनं केली आहे.

<><><><><><>

रेल्वे अपघातानंतर दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीत रेल्वेने 10 पट वाढ केली आहे. रेल्वे अपघातात मृत्यू झाल्यास पूर्वी 50 हजार रुपये दिले जायचे. त्याऐवजी आता 5 लाख रुपये दिले जातील. जखमींना दिली जाणारी 25 हजारांची मदत वाढवून अडीच लाख रुपये करण्यात आली आहे. किरकोळ जखमींना आता 5 हजारांऐवजी 50 हजार रुपयांचा मोबदला मिळेल. मदतीच्या रकमेशिवाय अपघातानंतर प्रवाशांचा रुग्णालयाचा खर्चही रेल्वे उचलणार आहे. मानवरहित रेल्वे फाटकावर अपघात झालेल्यांना, विनापरवानगी आत घुसलेल्यांना आणि रेल्वेच्या वीजवाहक तारांचा स्पर्श होऊन मृत्यूमुखी पडलेल्यांना कोणतीही अनुग्रह रक्कम दिली जाणार नाही, असं रेल्वे बोर्डानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><><>

उत्तरप्रदेशात गौतम बुद्ध नगर जिल्ह्यात आयोजित पहिल्या उत्तर प्रदेश आंतरराष्ट्रीय व्यापार महोत्सवाचं उद्घाटन आज राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते झालं. भारताला जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्यात उत्तरप्रदेश महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास राष्ट्रपतींनी यावेळी व्यक्त केला. यामधे युवाउद्योजक विशेषतः महिलांनी तयार केलेली उत्पादनांचं प्रदर्शन केलं आहे, महिला उद्योजकांचा सहभाग वाढत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. मात्र त्याबरोबरच ही गुंतवणूक वाढवणं गरजेचं आहे, असं त्या म्हणाल्या.

उत्तरप्रदेशाच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यावेळी उपस्थित होते. या महो◌ित्सवासाठी ७० हजारापेक्षा जास्त

व्यावसायिक खरेदीदारांनी नोंदणी केली आहे, अशी माहिती योगी आदित्यनाथ यांनी यावेळी दिली.

<><><><><><><>

कावेरी नदीच्या पाणीवाटप वादावर कर्नाटक किंवा तामिळनाडू यांच्यापैकी कुणाच्याही बाजूनं हस्तक्षेप करायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या नेतृत्वाखालच्या तीन सदस्यीय पीठापुढं याप्रकरणी सुनावणी सुरु आहे. दोन्ही शेजारी राज्यांमधे पाण्याचं वाटप कशा रितीनं व्हावं, ते कावेरी जलनियंत्रण समिती आणि कावेरी जलव्यवस्थापन प्राधिकरण यांच्या संयुक्त अभ्यास आणि निष्कर्षांवर अवलंबून राहील, असं न्यायालयानं स्पष्ट केलं.

<><><><><><><>

केंद्रीय कृषी राज्यमंत्री कैलाश चौधरी यांनी आज पीएम किसान ई मित्र या चॅटबॉटचं अनावरण केलं. पीएम किसान सम्मान निधी योजनेची माहिती यामाध्यमातून एका क्लिकवर शेतकऱ्यांना मिळेल. शेती आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकार करत असलेल्या प्रयत्नांमुळं शेती हा फायद्याचा व्यवसाय होत असून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होत असल्याचं ते म्हणाले.

<><><><><><><>

केंद्रसरकारनं विज्ञान, तंत्रज्ञान, आणि नवोन्मेष या क्षेत्रांमधे नव्या राष्ट्रीय विज्ञान पुरस्कारांची आज घोषणा केली. या क्षेत्रांमधल्या उल्लेखनीय आणि प्रेरणादायी योगदानासाठी हे पुरस्कार दिले जाणार आहेत. विज्ञान रत्न, विज्ञान श्री, विज्ञान युवा-शांतीस्वरुप भटनागर, आणि विज्ञान टीम अशा चार श्रेणींमधे हे पुरस्कार दिले जातील. या पुरस्कारांसाठी दरवर्षी १४ जानेवारीपासून २८ फेब्रुवारी अर्थात राष्ट्रीय विज्ञान दिनापर्यंत नामांकनं मागवली जातील. ११ मे या राष्ट्रीय

तंत्रज्ञानदिनी पुरस्कार विजेत्यांची नावं जाहीर केली जातील आणि राष्ट्रीय अंतराळ दिन, म्हणजे २३ ऑगस्टला पुरस्कार वितरण समारंभ होईल.

राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित आणि संगणक विज्ञान, पृथ्वीविज्ञान, औषध, अभियांत्रिकी विज्ञान, कृषी विज्ञान, पर्यावरणशास्त्र, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष, अणूऊर्जा, अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान, आणि इतर अशा १३ क्षेत्रांमधल्या योगदानासाठी दिले जातील.

<><><><><><><>

कॅनडामधल्या ई-व्हिसा सेवेसह व्हिसा सेवा भारतानं तात्पुरत्या स्थगित केल्या आहेत. कॅनडामध्ये हिंसाचारात झालेली वाढ, हिंसा रोखण्यात प्रशासनाची निष्क्रियता आणि भारतीय दुतावासाच्या कामकाजात व्यत्यय आणण्याच्या प्रयत्नांमुळं हा निर्णय घेतल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत सांगितलं. इतर कोणत्याही देशातून कॅनडियन नागरिकही भारतीय व्हिसासाठी अर्ज करू शकणार नाहीत. मात्र वैध व्हिसा किंवा इतर कागदपत्र असलेली कोणतीही व्यक्ती भारतात येऊ शकेल, असं ते यावेळी म्हणाले. दोन्ही देशांमध्ये दूतावासातल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या संख्येत समानता यावी अशी मागणी भारतानं केली होती. त्यामुळं भारतातल्या दुतावासातल्या कर्मचाऱ्यांची संख्या कॅनडा कमी करणार असल्याचं ते म्हणाले.

<><><><><><><>

आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय पुरुष फुटबॉल संघानं आज दुपारी हांगझोऊ इथं आपल्या दुसऱ्या गटातल्या सामन्यात बांगलादेशचा 1-0 असा पराभव केला. भारताचा पुढचा सामना रविवारी म्यानमार विरुद्ध होणार आहे. भारतीय महिलांच्या

फुटबॉल संघाला चाइनीज तैपेई कडून १-२ असा पराभव पत्करावा लागला. चीनमध्ये हुआंगलाँग स्पोर्ट्स सेंटर इथं ब गटात पहिल्या फेरीचा सामना झाला.

<><><><><><>

शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर शिंदे गटाचे प्रमुख एकनाथ शिंदे आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना येत्या एक-दोन दिवसांत नोटीस पाठवणार आहेत. नार्वेकर यांनी कायदेतज्ञ आणि विधीमंडळाच्या सचिवालयाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर दोन्ही गटाच्या प्रमुखांना नोटीसा पाठवण्याचा निर्णय घेतला असून, दोन्ही गटांच्या पक्षप्रमुखांनी आपली बाजू एक-दोन आठवड्यात मांडण्याबाबत या नोटीसा असण्याची शक्यता आहे, असं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

<><><><><><>

धनगर समाजाच्या आरक्षणाचा निर्णय घाईगडबडीत घेण्याऐवजी न्यायालयात टिकेल, असं देण्याची सरकारची भूमिका असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं आहे. धनगर समाजाच्या आरक्षणाविषयी आज मुंबईत झाली. बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह इतर मंत्री, आमदार आणि धनगर समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

//<><><><><><>//